# मराठवाड्याचे सांस्कृतिक संचित..!

**डॉ. मुंजा बा. धोंडगे**
**श्री. मुंजाजी रंगनाथराव चोरघडे**
*मराठी विभाग प्रमुख,*
*पंडित गुरु पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा, ता.परळी, जि.बीड*

**प्रास्ताविक** :

मराठवाडा या प्रदेशात गोदावरी नदीच्या काठी अश्मयुगीन काळापासून मानवी संस्कृती नांदत होती. याचा शोध मुंगी-पैठण येथे झालेल्या उत्खनावरून लागला. यामुळे या परिसरातील मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाला एक वेगळे वळण मिळाले. नंतरच्या काळात झालेल्या सर्वच सामाजिक बदलांची बीजे अस्मयुगीन संस्कृतीत लपलेली होती. अश्मयुगानंतर महाजन, नंद, मौर्य यांनी काही काळ या परिसरावर राज्य केले असले तरी खऱ्या अर्थाने सातवाहन काळापासून येथील संस्कृतीचा विकास झाला. त्यानंतर वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव या राज्यकर्त्यांनी त्यात भर टाकली. या प्रदीर्घ काळात शिल्प, स्थापत्य, संगीत, साहित्य, उपोग, व्यापार, शेती इत्यादींचा विकास झाला. या विविध राजवटींच्या राजकीय कारकिर्दीची परिणामकारकता म्हणून येथील संस्कृतीचा व कलांचा विकास झाला. या प्रदेशाच्या उत्कर्षाची पार्श्वभूमी शोधताना शिलालेख, ताम्रपट, शिल्पे, नाणी, मातीची भांडी इत्यादी पुरातत्त्वीय साधनांबरोबरच लिखित साहित्य व ग्रंथांचाही आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. या संदर्भ साधनांच्या महत्त्वाविषयी डॉ.यू. म. पठाण म्हणतात की, “मराठवाडा जशी संतांची भूमी आहे तशीच ती शिलालेख ताम्रपटांचीही भूमी आहे. या भूमीने शतकानुशतके जे जे पाहिले ते ते मोठे अपूर्व होते. त्या रम्य गतकाळाच्या खुणा या भूमीने आपल्या दगडधोंड्यात, आपल्या मातीतल्या कणाकणात, अणूरेणूत दडवून ठेवल्या. तसेच येथील मनाची स्पंदने कधी अंभगातून तर कधी पदातून, कधी आख्यानातून, तर कधी महाकाव्यातून, कधी भारुडातून तर कधी गवळणीतून, कधी ‘ल ला’ मधून तर कधी ‘बखरी-अकबरी’तून, कधी गीता टीकातून तर कधी महाभाष्यातून, कधी दशावतरातून तर कधी लळितातून, कधी संपादण्यांतून तर कधी स्तोत्र-विराण्यांतून मुक्तपणे प्रकट झाली.”[१] यावरून मराठवाड्याच्या सांस्कृतिक योगदानाचे महत्त्व कळते. प्राचीन काळापासून समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या काही महत्त्वाच्या पटकांचा आढावा घेणे क्रमप्राप्तच आहे. भारतीय कलांचा जन्म इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात झाला असून, त्यावर काळानुरूप हिंदू, बौद्ध, जैन या धर्म संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसतो. यातूनच विविध कलांचा विकास झाला. प्राचीन मराठवाड्याच्या सांस्कृतिक पर्वाचा शोध घेताना साहित्यादी कलांची कामगिरी तितकीच उल्लेखनीय ठरते. कुठलीही कला ही व्यक्तिमनाच्या अभिव्यक्तीतून साकार होत असते. मराठवाड्याच्या समृद्ध अशा विविध कलांच्या वारशावरून मराठवड्यातील सांस्कृतिकतेची कल्पना येते.

**स्थापत्य.**

कलांच्या अंगाने मराठवाड्याची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी स्थापत्यकलेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. विविध मंदिरे, गुंफा, लेणी, गुहा, बारव, घाट, राजवाडे, तट, दरवाजे आदींवरून या कलेचे स्वरूप कळते. मंदिर स्थापत्याच्या बाबतीत विचार करता, सहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत मोठ्या प्रमाणात मंदिराची उभारणी झाल्याचे दिसते. यांपैकी तेर येथील ‘त्रिविक्रमाचे’ मंदिर अतिप्राचीन असून, या प्रकारचे मंदिर जगात इतरत्र कोठेही आढळत नाही. राष्ट्रकूटकालीन कंधार येथील कालप्रियनाथाचे मंदिर, तसेच वेरुळचे कैलास मंदिर मराठवड्यातील स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. चालुक्य काळात अंबाजोगाई, लातूर, धाराशिव, धर्मापुरी या ठिकाणी मंदिरांची उभारणी केली गेली. पुढे यादवांच्या काळातही हाच वारसा पुढे सातत्याने चालू राहिलेला दिसतोय. त्यांच्या दरबारातील हेमाद्री हा चिटणीस अनेक शास्त्रांचा व्यासंगी अभ्यासक होता. त्याने

स्वतंत्र अशा मंदिर स्थापत्य कलेची निर्मिती केली. यावरून या मंदिरांना 'हेमाडपंती' हा शब्द रूढ झाला. मराठवाड्यातील अंभई, अन्वा, धर्मापुरी, निलंगा, औसा, चंपावती (बीड), औंढा, परळी, अंबाजोगाई इत्यादी ठिकाणी ही मंदिरे आजही अस्तित्वात आहेत. मंदिराप्रमाणेच लेण्यासुद्धा स्थापत्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकात महाराष्ट्रात लेणी कोरण्यास प्रारंभ झाला. मराठवाड्यातही विविध काळात लेण्यांची निर्मिती झाली. त्यांत अजिंठा, वेरूळ, पितळखोरा, औरंगाबाद, खरोसा, माहूर, उस्मानाबाद, शिऊर, लोहगड नांद्रा इत्यादी ठिकाणच्या लेण्यांचा समावेश त्यात करता येईल. यांपैकी अजिंठा व वेरूळ येथील लेण्यांना जागतिक गौरव प्राप्त झाला आहे. वाकाटक काळात अजिंठा, तर राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याच्या काळात वेरूळचे कैलास लेणे कोरले गेले.'आधी कळस, मग पाया' याप्रमाणे कोरले गेलेले हे जगातील एकमेव लेणे आहे. शिवाय ते आजच्या स्थापत्य शास्त्राला आवाहन देणारे आहे. यामुळे लेणीपैकी जैन, हिंदू लेणींपेक्षा बौद्ध लेणींची संख्या जास्त आहे. यावरून या प्रदेशातील स्थापत्य कलेची ओळख पटते.

**शिल्पकला.**

स्थापत्याबरोबरच शिल्पकलेचाही विकास या काळात झाला. मौर्य काळात निर्माण झालेले बौद्ध स्तूप, विहार, चैत्यगृहे याच्या निर्मितीपासून शिल्पकलेस सर्वमान्यता मिळाली. तत्कालीन अशोक स्तंभ हा जागतिक शिल्पकलेतील अद्वितीय असा नमुना आहे. पुढे या सत्तांचा दक्षिण भारताशी संबंध आल्यावर या कला या प्रदेशात रुजल्या व सातवाहन काळात त्यांचा मुक्ताविष्कार झाला. पितळखोरा, अजिंठा लेणी क्र.९,१०,१२,१३,१५ मधील शिल्पे, भोकरदन येथे उत्खननात सापडलेल्या बांगड्या, स्त्रीमूर्ती; तेर येथे सापडलेल्या मूर्तीमधून सातवाहनकालीन शिल्पकलेचा प्रत्यय येतो. वाकाटकांच्या काळात अजिंठा येथील लेणी क्र.१६,१७,१९ ची निर्मिती झाली. यामधील सर्व शिल्पे गौतम बुद्धांच्या जीवनाशी निगडित आहेत. यासाठी जातक कथांचा आधार घेतला गेला. याविषयी ग्रिफीथ नावाचा इतिहासकार म्हणतो -"शोक' कारुण्य आणि स्पष्ट रीतीने कथाकथनाची पद्धत याबाबतीत येथील शिल्पांना मागे टाकणारी कृती कलेच्या इतिहासात सापडणार नाही.' कॉलेन्स किंवा व्हेनिसच्या शिल्पकारांनाही यातील भावना यापेक्षा जास्त उत्तम रीतीने व्यक्त करता आल्या नसत्या."[२] यातील शिल्पे गौतम बुद्धांच्या विविध भावावस्था प्रगट करणाऱ्या आहेत. यानंतर सत्तेपदी रूढ झालेल्या राष्ट्रकुटांच्या काळात निर्माण झालेले वेरूळचे कैलास लेणे व त्यात कोरलेली विविध शिल्पे बौद्ध, जैन, हिंदू धर्माचा अमूल्य असा सांस्कृतिक ठेवा आहे. गौतम बुद्धाबरोबरच शिवमूर्ती, गणेश, शिवपार्वती विवाह, गंगाधर मूर्ती, शिवपिंड, ब्रह्मा-विष्णू-महेश, नृसिंह इत्यादी हिंदू देवतांची शिल्पेसुद्धा कोरण्यात आली. शिवाय बाहुबली, पार्श्वनाथ, भगवान महावीर, गोमटेश्वर इत्यादी जैन धर्मीय शिल्पेही आहेत. यावरून स्पष्ट होते की, राष्ट्रकुटांनी हिंदू धर्माबरोबरच जैन व बौद्ध धर्मास राजाश्रय देऊन धर्मसहिष्णूतेची वृत्ती जपली. यामुळे त्यांच्या काळात तिन्हीही धर्माच्या संस्कृतींचा प्रसार झाला. चालुक्य काळात अंबाजोगाई, सुगाव, होट्टल, मुखेड, धर्मापुरी इत्यादी ठिकाणी मंदिरे निर्माण झाली. यांपैकी धर्मापुरी येथील शिल्पे सौंदर्याच्या दृष्टीने रेखीव, सजीव व भावपूर्ण आहेत. पुढे यादवांच्या काळात शिल्पकलेचा विकास झपाट्याने झाला. हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत, खोलेश्वर या कर्तबगार सरदारामुळे यादवकाळात शिल्पकलेने अत्युच्च शिखर गाठले. हेमाद्री हा वास्तुशास्त्राचा व्यासंगी अभ्यासक होता. त्याने स्वतंत्र अशा मंदिर शैलीची निर्मिती केली अन्वा, पानगाव, बीड, धर्मापुरी, निलंगा, पाल येथील मंदिरे शिल्पकलेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतात. हेमाद्रीने निर्माण केलेल्या या वेगळ्या बांधणीच्या शैलीवरून या मंदिरांना 'हेमाडपंती' असे म्हणतात.याशिवाय या प्रदेशातील परंडा, उदगीर, नळदुर्ग, माहूर, कंधार, जिंतूर, औसा, नांदेड इत्यादी किल्ले, बीबी का मकबरा, मशिदी, दर्गे, समाध्या, बारव, वाडे, घाट, दरवाजे इत्यादी सर्व शिल्पकलेच्या दृष्टीने तत्कालीन काळाचे वैभव सांगणारे आहे.

**संगीतकला.**

यादवकाळापासून खऱ्या अर्थाने मराठवड्यातील संगीत कलेला शास्त्रीय आधार मिळाला. संगीत ही प्राचीन कला असून, ती मानवी जगण्याचा अविभाज्य भाग आहे. या कलेचा विकास पाहताना यापूर्वी संगीत कला नव्हती असे नाही. तर तिचे

स्वरूप हे पारंपरिक होते. यादव राजे हे संगीताचे रसिक असल्यामुळे त्यांनी गायकांना दरबारी राजाश्रय दिला. येथूनच खऱ्या अर्थाने या कलेचा विकास झाला. " शारंगदेव हे यादव दरबारात गायक होते. त्यांनी आपल्या व्यासंगातून लिहिलेला 'संगीतरत्नाकर' ग्रंथ म्हणजे तत्कालीन संगीत परंपरेचा इतिहास विशद करणारा महत्त्वाचा ग्रंथ होय. त्यांच्या या ग्रंथामुळे येथील संगीताला सैद्धांतिक स्वरूप प्राप्त झाले. मूळचे काश्मीरमधील असणारे शारंगदेव यादवांच्या दरबारात महालेखा परीक्षक होते."[३] भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्रा'चा आधार घेत प्राचीन गायन पद्धतीत त्यांनी बदल केला. नव्या श्रुतींची निर्मिती करून त्यावर आधारित स्वतंत्र सांगीतिक संज्ञा रूढ केल्या. यामुळे अनेक नवीन रागांचा शोध लागला. संगीताचा मूलस्रोत ठरणाऱ्या शारगदेवांच्या या ग्रंथावर सिंगण राजा सहित अनेकांनी टीका लिहिली. संगीताबरोबरच आयुर्वेद, योग, वेदांत याचाही शारंगदेवांना व्यासंग होता. गोपालनायक हे यादव दरबारातील दुसरे महत्त्वाचे राजगायक होत. ते वीणेवर गायन करीत असताना सुमधुर स्वरामुळे अनेक पशु-पक्षी त्यांच्याजवळ येऊन बसत. या बाबतीत अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यांनी नव्या रागशैलीची निर्मिती केली.'देवगिरी बिलावल' हा त्यांपैकीच एक महत्त्वाचा राग होय.रामदेवरायांची मुलगी जेठाई ही गोपालनायकांची शिष्या होती. तिचा पतीसुद्धा संगीत, नृत्याचा अभ्यासक होता. त्याने नृत्यावर लिहिलेला 'संगीत सुधाकर' ग्रंथ नृत्याचा शास्त्रीय आधार होय. पाश्वदेव या गायकानेसुद्धा संगीत कलेच्या प्रसार व प्रचारासाठी कार्य केले. एकूणच मध्ययुगीन काळात एका समृद्ध अशा संगीत परंपरेचा उदय झाला;पण खिलजीच्या स्वारीबरोबर सोन्या-चांदीच्या खजिन्यांसह अनमोल संगीत कलेची लूटही अमीर खुस्रो या उत्तरेकडील गायकाने केली. असे असले तरी दक्षिणेतील संगीताचा मूळ पाया भक्कम करण्याचे कार्य या दरबारी गायकांनी केले.यावरून असे म्हणता येईल की, नंतरच्या काळात झालेल्या अकबराच्या नवरत्न दरबारापेक्षा तत्कालीन काळात मराठवाडा प्रदेशातील संगीतकारांनी केलेले कार्य मोठेच आहे.

**चित्रकला.**

आदिम मानवाने आकाश, पृथ्वी, नद्या, ग्रह-तारे, सूर्य-चंद्र या नैसर्गिक शक्तींना आध्यात्मिक रूप देऊन चित्रांद्वारे त्यास आकार दिला. चित्रकलेस प्राचीन इतिहास असून, प्रारंभी गुहा, लाकूड, भिंती, शिलाखंडावर चित्र काढण्याची प्रथा होती. मानवी उत्क्रांतीबरोबरच चित्रकलेचा विकास होऊन सातवाहन, राष्ट्रकुट काळात हिंद, जैन, बौद्ध संस्कृतीच्या प्रभावामुळे या कलेचे स्वरूप बदलले. मराठवाडा प्रदेशातील अजिंठा, वेरूळ व इतर लेण्यांमधील जागतिक कीर्तीस पात्र ठरलेली चित्रे या प्रदेशाचा सांस्कृतिक ठेवा आहेत. या चित्रांचे निर्मिती तंत्र, कुशलता अत्यंत प्रगल्भ होती. भिंत छिनून, तासून त्यावर, चुनखडी, शेण व कडब्याचा भुसा, गूळ, मोरचूद, बेलफूल इत्यादीचे मिश्रण करून त्याचा गिलावा केला आहे. भिंतीस गुळगुळीत केल्यावर विविध झाडांच्या साली, फुले, फळे, डिंक, चिकांपासून रंग तयार केले जात. यामुळे रंगांना तेजस्वी व रेखीवपणा येऊन ते जास्त काळ टिकत. यामुळेच आजही शेकडो वर्षांनंतर अजिंठा, वेरूळची चित्रकला टिकून आहे.लेण्यांबरोबरच किल्ले, राजवाडे, बारव, खंदक, दरवाजे, वस्त्रे यावरही चित्रे काढली गेले. आदिवासींनी खऱ्या अर्थाने ही कला जोपासली.'वारली चित्रे' हा त्याचा उत्तम नमुना आहे. सातवाहन, राष्ट्रकूट काळात या कलेचा झालेला विकास एकूणच मराठवड्यातील चित्रकलेचे वैभव सांगणारा आहे. यामुळेच अजिंठा-वेरूळची चित्रकला आजही जागतिक कलावंतांसाठी आवाहन ठरली आहे.

**साहित्य कला.**

मराठवाड्याच्या सांस्कृतिक पर्वाचा शोध घेताना साहित्याची कामगिरी तितकीच उल्लेखनीय ठरते. कुठलीही कला ही व्यक्तिमनाच्या अभिव्यक्तीतून साकारत असते, साहित्यही यास अपवाद नाही. साहित्याची एक समृद्ध परंपरा या प्रदेशाला लाभलेली आहे. येथे लिखित साहित्याचाच विचार करण्यात आला आहे. या प्रदेशातील लिखित साहित्याचा विचार करता, सातवाहनकाळापासून लिखित संदर्भ उपलब्ध होतात. सातवाहन घराण्यातील राजा हाल याने संपादित केलेला 'गाथासप्तशती'(गाहासत्तसई) हा महाराष्ट्र प्राकृत भाषेतील शृंगार रसप्रधान ग्रंथ महत्त्वाचा आहे. यातील काव्य हे जानपद गीताच्या अंगाने जाणारे असून, त्यात बहुजन समाजातील स्त्री-पुरुषांच्या भाव-भावना प्रतिबिंबित होतात."रेवा, रोहा, माधवी,

अनुलक्ष्मी, पहवी, शशिप्रभा या कवयित्रींनी या ग्रंथाच्या संकलनात सहभाग घेतला."[४] यातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. याशिवाय श्रीपालीतचे- 'तरंगवती', नंदीवृद्धचा 'गाथा लक्ष्मण', गुणाढ्याचा-पैशाची भाषेतील 'बृहत्कथा', वात्स्यायनाचे 'कामसूत्र', शर्ववर्माचे- 'व्याकरण', शूद्रकाचे 'मृच्छकटिक'इत्यादी ग्रंथ या काळात निर्माण झाले. शर्ववर्माच्या व्याकरणातून सातवाहनकालीन भाषा, तिचे स्वरूप, इतर भाषांशी तिचा संबंध, तिचे वेगळेपण याची वाचकांना ओळख होते. गुणाढ्याच्या 'बृहत्कथा'मधून तत्कालीन समाजाची माहिती मिळते. वाकाटक काळात सर्वसेनाने लिहिलेले 'हरिविजय' हे महाराष्ट्र प्राकृत भाषेतील काव्य महत्त्वाचे आहे. त्यातील काही गाथा या 'गाथासप्तशती'त समाविष्ट आहेत. राष्ट्रकूट व चालुक्यकालीन साहित्य हे संस्कृत व कन्नड भाषेत लिहिले गेले. चालुक्य घराण्यातील राजा सोमेश्वर तिसरा याचा 'मानसोल्लास' उर्फ 'अभिलाषितार्थ चिंतामणी' हा ग्रंथ विविध शास्त्रांत समन्वय साधणारा आहे. त्यात प्रामुख्याने राजकारण, रणनीती, न्यायशास्त्र, ज्योतिष, अलंकार, संगीत, व्यापार, क्रीडा, भूगोल आदी विषयांवर भाष्य केले आहे.

यादवकाळातही विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली. मूलतः यादव राजेच कलांचे चाहते असल्यामुळे त्यांच्या राजदरबारात अनेक विद्वानांचा समावेश होता. हेमाद्री उर्फ हेमाडपंत, बोपदेव यांची साहित्यनिर्मिती उल्लेखनीय आहे. हेमाद्रीचा 'चतुर्वर्ग चिंतामणी' हा संस्कृतमध्ये लिहिलेला अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ असून, त्याची विभागणी व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड अशा चार विभागांत केली आहे. 'कालनिर्णय', 'तिथीनिर्णय', 'कैवल्यदीपिका', 'आयुर्वेद रामायण', 'दानवाक्यावली', 'पर्जन्यप्रयोग', 'लक्षण समुच्चय', 'हेमाद्री निर्बंध', 'त्रिस्थलविधी', 'अर्थकांड' हे ग्रंथपण त्यांच्या नावावर आहेत. बोपदेव हासुद्धा हेमाद्रीप्रमाणेच व्यासंगी अभ्यासक होता. साहित्य, व्याकरण, वैद्यकशास्त्र, तत्त्वज्ञान व तिथिनिर्णय यावर त्याने एकूण सव्वीस ग्रंथ लिहिले. याशिवाय नृसिंहाचे- 'नलोपख्यान', 'साल कवीचे- 'रामायण', भास्कराचार्यांचे 'सिद्धांतशिरोमणी' व 'करण कुतूहल', नरेंद्राचे-'रुक्मिणी-स्वयंवर' हेही महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

साहित्याबरोबरच शास्त्रीय संगीतावर निशङ्क शारंगदेव, गोपालनायक, हरपाल देव, जेठाई यांनीही ग्रंथलेखन केले. यादवकाळात मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवणारे तसेच 'आद्यकवी' असे नामाभिधान मिळविणारे मुकुंदराज याच काळात होऊन गेले. अंबाजोगाईस्थित मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू', 'परमामृत', 'पवनविजय' हे ग्रंथ लिहिले.'विवेकसिंधू' हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ असून, मूळ उपनिषदांच्या आधारे आध्यात्मिक तत्त्वज्ञानावर त्याची मांडणी केलेली आहे. त्याची निर्मिती राजा जैत्रपाळाशी घडलेल्या संवादातून झाल्यामुळे निवेदन पद्धती गुरु-शिष्य संवादरूपात येते. वेद आणि अध्यात्माचा सुंदर समन्वयया ग्रंथात साधल्यामुळे अनेकदा पुराणाचा संदर्भही त्यातून येतो. दोन भागांत विभागलेल्या या ग्रंथात संस्कृत शब्दांबरोबरच बरेच पारिभाषिक शब्दही येतात. त्याची मांडणी ज्ञानेश्वरी किंवा इतर महानुभावीय ग्रंथाप्रमाणे ओवीरुपात केल्यामुळे उपमा, प्रतिमा, दृष्टांतांचा वापर पदोपदी केलेला आढळतो. त्यामुळे तत्त्वज्ञानावर आधारित असूनही वाङ्मयीन मूल्यांच्या संदर्भात हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.'परमामृत' व 'पवनविजय' या ग्रंथामध्ये 'विवेकसिंधू'मधील काही विषयांची संक्षेपाने चर्चा केली आहे. एकूणच मुकंदराजांच्या या ग्रंथनिर्मितीतून साहित्यमूल्यांचा प्रत्यय येतो. यादवकाळ हा इतिहासातील सुवर्णकाळ होता. त्याला कला, साहित्य, संस्कृतीच्या उत्कर्षामुळे परिपूर्णता आली असली तरी सामाजिक दुभंग, उलथापालथ, अराजकता याला पायबंद घालण्यासाठी निर्माण झालेल्या चळवळी, विविध धर्मसंप्रदायाच्या निर्मितीची संक्रमणावस्था या राजवटीने व समाजाने या काळात अनुभवली. महानुभाव व वारकरी हे दोन संप्रदाय किंवा पंथ याच संक्रमणावस्थेचे अपत्य होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

तत्कालात सामाजिक ऐक्यास अधिष्ठान प्राप्त करून देऊन, समाजात सलोखा निर्माण करण्याचे कार्य महानुभावांच्या साहित्याने केले. या पंथाचे श्री. गोविंदप्रभू ऊर्फ गुंडम राऊळ व प्रणेते श्री.चक्रधरस्वामी यांना आदर्श मानून, श्रीकृष्ण भक्तीचा स्वीकार या पंथाने केला. त्यांच्या साहित्यातूनही हीच समाजमूल्ये प्रतिपादित झालेली दिसतात. या संप्रदायाने विपुल साहित्यनिर्मिती केली असली तरी या ठिकाणी मराठवाडा प्रदेशातील महानुभाव साहित्याचाच विचार करण्यात येईल.

'लीळाचरित' हा महानुभाव संप्रदायांचा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा असून, त्यात पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांच्या लीळा (आठवणी) सांगितल्या आहेत. त्याची मांडणी एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशी केली असून, प्रत्येक भागाच्या केंद्रस्थानी चक्रधर स्वामी आहेत. एकांक व पूर्वार्धातून मराठवाडा प्रदेशात नांदेड, बीड, पैठण, फुलंब्री, शहागड, गेवराई या ठिकाणी स्वामींनी भेटी दिल्याचे संदर्भ येतात. या सर्व लीळा आठवणीवजा असून, चक्रधरांच्या सान्निध्यात आलेल्या शिष्यांसह समाजातील इतर व्यक्तींनी त्या सांगितलेल्या आहेत. असे असले तरी या घटना-प्रसंगातून चक्रधरांच्या व्यक्तित्त्वाबरोबरच पंथाचा आचारधर्म, तत्त्वज्ञान, तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक घडामोडी, वृत्ती-प्रवृत्तींचा वेध घेता येतो. यामुळे म्हाइभंट संकलित हा ग्रंथ महानुभाव तत्त्वज्ञान व साहित्याचा मूलाधार ठरतो. महानुभाव पंथाचे आद्य आचार्य नागदेवाचार्य उर्फ भटोबांस हे मराठवाड्याच्या बीड जिल्हयातील पुरी गावचे असून, त्यांनी प्रमाणित केलेल्या लीळाच म्हाइभटांनी संपादित केलेल्या आहेत. यावरून त्यांनी प्रत्यक्ष ग्रंथनिर्मिती केली नसली तरी त्यांचा तत्त्वज्ञानाचा व्यासंग यातून जाणवतो. पैठणजवळील वरखेडवाडे गावचे केशवव्यास उर्फ केसोबांस यांनी 'लीळाचरित्रातील' चक्रधरांच्या निवडक वचनांवर आधारित 'सूत्रपाठा'ची निर्मिती केली. बीडजवळील येळंब गावच्या चक्रपाणी येळंबकर यांनी तर हिंदी भाषेत 'तीसा' नावाची मौलिक रचना केली आहे. शहागड येथील शहामुनी या मुस्लिम कवीवरही महानुभाव तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसतो. या गद्यनिर्मितीबरोबरच या पंथात पद्यनिर्मितीही मोठ्या प्रमाणात झाली. याचाही मान या प्रदेशातील रावसगावच्या महदंबा या कवयित्रीकडे जातो. तिने 'धवळे'हा पद्य ग्रंथ लिहिला.(धवळे म्हणजे लग्नात गावयाचे गीत) या ग्रंथाचे दोन भाग असून, पूर्वार्धात रुक्मिणी हरणाचा तर उत्तरार्धात रुक्मिणी स्वयंवराचा कथाभाग आला आहे.'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' हे काव्यही तिच्या नावावर आहे. त्यात श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या आठवणी आहेत. याशिवाय आरती, ओव्यांची स्फूट रचनाही महदंबेने केली. तिच्या या समग्र साहित्यातून पंथीय तत्त्वज्ञानाबरोबरच स्त्रीमनाची तरल संवेदना प्रतिबिंबित होते. याशिवाय महानुभाव संप्रदायात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेल्या 'सातीग्रंथा'पैकी भास्करभट्ट बोरीकर व नरेंद्र या कवींच्या रचना महत्त्वाच्या आहेत.'शिशुपालवध' हे आख्यानकाव्य असून, त्यावर संस्कृत कवी माघ यांच्या 'शिशुपालवध' या काव्याचा प्रभाव जाणवतो. तर 'उद्धवगीता' हा व्यास रचित भागवताच्या एकादश स्कंधावर लिहिलेली टीका होय. या दोन्ही ग्रंथांत बोरीकरांच्या तत्त्वज्ञानाचा व्यासंग जाणवतो. नरेंद्र हा यादव दरबारातील महानुभाव कवी असून, 'रुक्मिणीस्वयंवर' या ग्रंथाची त्याने निर्मिती केली. यातून त्याने श्रीकृष्णभक्तीचा महिमा गायिला आहे. एकूणच या प्रदेशातील कवीबरोबरच इतरांनीही पंथाच्या तत्त्वज्ञानावर लेखन केले. यामुळे मराठवड्यातील साहित्याला समृद्धता प्राप्त झाली.

वारकरी संप्रदाय किंवा भागवत संप्रदाय हा देखील महानुभाव पंथाच्या समकाळातच उदय पावलेला दुसरा महत्त्वाचा पंथ/ संप्रदाय आहे. पंढरीचा पांडुरंग हे त्यांचे दैवत असून, 'तुळशी माळ गळा। गोपीचंदन टीळा। हृदयी कळवळा वैष्णवांच्या'॥ हा पंथाचा आचारधर्म आहे. यातील संतांनी निर्मिलेल्या साहित्यामुळे मध्ययुगीन कालखंडात साहित्यप्रवाहाला एक वेगळे परिमाण मिळाले. या पंथाच्या स्थापनेस मराठवाडा प्रदेशाचे संदर्भ असल्यामुळे या साहित्याने एक स्वतंत्र प्रवाह व्यापला. त्यात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, समर्थ रामदास, जनाबाई, गोरा कुंभार आदी संतांच्या रचनांचा समावेश होतो. ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' ऊर्फ 'भावार्थ दीपिका' या ग्रंथाला पंथात महत्त्वाचे स्थान असून, त्याची रचना गीतेवर आधारित मूळ श्लोक व अध्यायाची क्रमवारी न बदलता केलेली आहे. अठरा अध्याय व नऊ हजार ओव्यांमधून अत्यंत सोप्या भाषेत जानेश्वरांनी गीतेवरील तत्त्वज्ञानाची मीमांसा केली आहे. यामुळे गीतेचे बोजड तत्त्वज्ञान सोप्या व रसाळ भाषेत सर्वसामान्यांसाठी खुले झाले. ज्ञानेश्वरीच्या श्रेष्ठत्वाविषयी संत नामदेव म्हणतात- 'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी'। यावरून या ग्रंथाचे महत्त्व सिद्ध होते. याशिवाय 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', 'हरिपाठाचे अभंग', 'विराण्या','गौळणीं'ची निर्मिती करून ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानदेवी रचला पाया' ही बहिणाबाईंची उक्ती सार्थ ठरविली. या प्रदेशातील दुसरे महत्वाचे संतकवी व कीर्तनपरंपरेचे संस्थापक आणि भागवत संप्रदायाचे प्रचारक संत नामदेव हे परभणीजवळील नरसी बामणी या गावचे

होते.'शतकोटी तुझे करीन अभंग' ही त्यांची प्रतिज्ञा होती. आज सुमारे अडीच हजार अभंग त्यांच्या नावावर आढळतात. त्यात आत्मनिवेदन, बाळक्रीडा व ज्ञानेश्वर चरित्रावर अभंग मोठ्या प्रमाणात आहेत. या अभंगातून नामदेवांचे अनेक पैलू आविष्कृत होतात. याशिवाय नामदेवांच्या समकालात संत गोरा कुंभार, संत विठोबा खेचर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई यांनीही अभंगरचना केली. 'विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा'। या अभंगातून संत जनाबाई पंढरीच्या विठ्ठलास कुटुंबप्रमुखाच्या भूमिकेत पाहतात. भक्तीच्या जोरावर गोपाळांचा मेळा भरविते. यातून संत जनाबाईंची विठ्ठलाप्रति असलेली भावना व्यक्त होते. परळीच्या संत जगन्मित्र नागा यांनीही काही पदे लिहिलेली आहेत.

मध्ययुगीन काळात एकनाथांचे पणजोबा भानुदास यांनी मराठी व हिंदी भाषेट स्फुट रचना केली. तसेच त्यांचे गुरु जनार्दन स्वामी यांनी 'भक्ति भाग्य', 'अध्यात्म विवेकसार', 'समाधीपकरण', 'श्री. दत्तस्तुती उपदेश'या ग्रंथांमधून आध्यात्मिक उपदेश केला आहे. अंबाजोगाई येथील दासोपंत ऊर्फ दासो दिगंबर यांनी 'गीतार्णव', 'ग्रंथराज' मधून वेद आणि सिद्धांत यांवर भाष्य केले आहे. पासोडीवर त्यांनी केलेले लेखन उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. याच काळात परकीय आक्रमणामुळे समाज, भाषा, संस्कृतीवर फार मोठा आघात झाला. यातून सावरण्याचे बळ देणाऱ्या संत एकनाथांचे कार्यही उल्लेखनीय ठरते. पैठण येथील आध्यात्मिक प्रबोधनाची चळवळीला त्यांनी चालना दिली. यासाठी त्यांनी 'चतु:श्लोकी भागवत', 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण' या ग्रंथांबरोबरच गौळणी, भारुडे, पदे, स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. पौराणिक संदर्भाना अध्यात्माची जोड देऊन प्रबोधनात्मक अंगाने या ग्रंथांची मांडणी केलेली आहे. वारकरी संप्रदायांच्या बाबतीत बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे 'जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत'। यातून त्यांचे योगदान स्पष्ट होते. म्हणूनच एकनाथांना लोकशिक्षक म्हणतात.

स्वतंत्र संप्रदायाची स्थापना करून, विपुल साहित्यनिर्मिती करणारे संत रामदास ऊर्फ नारायण ठोसर हे मराठवाड्यातील महत्त्वाचे संतकवी होत. 'करुणाष्टके', 'दासबोध', 'मनाचे श्लोक', 'रामायणे' व काही स्फुट प्रकरणे ही रामदासांच्या नावावर आहेत. रामाची भक्ती व हनुमानाच्या शक्तीबद्दल सामान्य माणसांच्या मनात जागृती करून त्यांनी तत्कालीन अस्मानी-सुलतानीला आव्हान दिले होते. मराठी माणसांच्या दैनंदिन जगण्यातील प्रश्नांनाच बोधाचे स्वरूप देऊन त्यांना व्यवहारधर्म शिकविला. समाजात भक्तीचा प्रसार करून सहिष्णुता निर्माण केली. म्हणून समर्थ संप्रदायी असूनही रामदासांचे योगदान वारकरी पंथातून वजा करता येत नाही. या संतांबरोबरच शेख महंमद, कल्याण स्वामी, विठ्ठल बीडकर, मुक्तेश्वर, कृष्णदयार्णव, वामन पंडित, मध्वमुनीश्वर, अमृतराय, मन्मथस्वामी, शिवदास, दासगण, हंसराज, शिवदिन केसरी, लक्ष्मण महाराज, नाथभुजंग, रघुनाथ शेष, वली महंमद औरंगाबादी, शहा शिराजुद्दीन, काळू महाराज या सर्व संतांनी वेगवेगळ्या धर्मसंप्रदायांचा अनुग्रह स्वीकारलेला असला, तरी भक्तीच्या जोरावर सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी त्यांनी साहित्यनिर्मिती केली. एकूणच मराठवाडा प्रदेशातील साहित्याला प्राचीन काळापासूनची समृद्ध परंपरा असून, विविध राजवटीच्या काळात समकालीन सामाजिक प्रश्नांचा धांडोळा घेत या साहित्यप्रवाहाने मार्गक्रमण केले आहे. म्हणून हे नुसते साहित्य नसून, या प्रदेशाच्या इतिहासाचा व इथल्या समाजाच्या संस्कृतिक जीवनाचा मुख्य दस्तऐवज आहे.

**कृषिसंस्कृती**

लोहयुगापासून मानवी संस्कृतीचा झपाट्याने विकास झाला. मानवाची भटकंती थांबून तो स्थिर झाला. यामुळे त्याचे जीवनमान बदलले. पाण्यासाठी नद्यांच्या काठी तो वस्ती करून राहू लागला. यातूनच कुटुंबव्यवस्थेचा जन्म झाला. अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठी नदीकाठी सपाट जमिनीवर शेती करण्यास त्याने प्रारंभ केला. हीच कृषिसंस्कृतीची प्रारंभिक अवस्था होय. मराठवाड्याच्या संदर्भात विचार करताना पहिल्यांदा गोदावरीच्या काठी शेतीचा प्रारंभ झाला. कारण "'नाशिक', 'जोर्वे', 'नेवासे' या परिसरात कृषी संस्कृतीचे प्राचीन पुरावे सापडले आहेत. येथे गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा इत्यादी पिके काढली जात."[५] 'गाथासप्तशती'त जानपदगीतांतून धान्याच्या विविध जातीच्या प्रकारांचा उल्लेख आला आहे. याशिवाय या प्रदेशातील

जमीन काळी कसदार असल्यामुळे लोखंडी नांगराची निर्मिती येथेच झाली. यावरून या प्रदेशात कृषिसंस्कृतीचा विकास प्राचीन काळापासून झाला असल्याचे दिसून येते.

**उद्योग व व्यापार**

मराठवाडा प्रदेशाला उद्योग व व्यापाराची प्राचीन परंपरा आह. सातवाहन कालखंडात उद्योग व व्यापाराची भरभराट झाली. त्यांचे स्थिर प्रशासन, व्यापारविषयक प्रगत दृष्टिकोन यामुळे सातवाहनांचा ग्रीक, रोमन सम्राज्यांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाला. भोकरदन, तेर, पैठण या तत्कालीन काळात मुख्य बाजारपेठा होत्या. भारतातील सर्व मुख्य रस्ते हे पैठणवरून जात असल्यामुळे, दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे व्यापारात प्रगती झाली. या प्रदेशात तयार होणारे रेशीम व तलम वस्त्रे, हस्तदंती वस्तू, मसाल्याचे पदार्थ यांना विदेशांत प्रचंड मागणी होती. यामुळे पाश्चिमात्य संपत्तीचा आर्थिक ओघ पूर्वेकडे म्हणजेच मराठवाड्याकडे वाहत होता. यासाठी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर भडोच, कल्याण, नालासोपारा येथे खास बंदरांची निर्मिती करण्यात आली होती. तत्कालीन व्यापारविषयक समृद्धीचे वर्णन करताना टॉलेमी पेरिप्लस हा इतिहासकार म्हणतो, "पैठण व तगर (तेर) या दक्षिणपथातील दोन बाजारपेठा होत्या. तगर हे मोठे शहर असून, तेथे पूर्वकिनाऱ्यालगतच्या प्रदेशातील कापड व अन्य माल येई. तेथून तो भडोचला रवाना होई. या व्यापारी भरभराटीमुळे रोमन साम्राज्याच्या आर्थिक प्रगतीस धोका निर्माण झाला आहे."[६] यावरून सातवाहनकालीन व्यापार उद्योगाची समृद्धता लक्षात येते. पुढच्या काळात या प्रदेशात झालेल्या विविध राजवटींनी यानुसारच व्यापारविषयक धोरण राबविले. परिणामी मराठवाड्यात नागरी संस्कृतीचा विकास झपाट्याने झाला. पाश्चिमात्य जगात मध्ययुगीन काळात झालेल्या औद्योगिक क्रांतीच्या अगोदर मराठवाड्याने उद्योग-व्यापारात घेतलेली गरुडझेप जागतिक अर्थकारणाचे समीकरणे बदलण्यास महत्त्वाची ठरत होती.

**समारोप.**

स्थापत्य, शिल्प, संगीत, चित्र या कलांबरोबरच उत्खननात सापडलेल्या विविध भांडी, बांगड्या, बाहुल्या, धातू यावरून हस्तकलांचा विकास या काळात झाल्याचा दिसतो. मराठवाड्यातील पैठण, देवगिरी, भोकरदन, तेर, कंधार येथे झालेल्या उत्खननात दगडी हत्यारे, हस्तीदंती मूर्ती, खेळणी, दिवे, नाणी, बांगड्या, मणी यावरून तत्कालीन हस्तकलेची प्रचिती येते. भोकरदन व तेर येथे सापडलेल्या दोन बाहुल्या ग्रीक, रोम येथील मूर्तीशी साधर्म्य सांगणाऱ्या आहेत. तत्कालीन काळात या कलेचे झालेले आदान-प्रदान येथील कलेचे श्रेष्ठपण ठरवणारे आहे. एकूणच या सर्व कलांमधून मराठवाडा या प्रदेशाचे सांस्कृतिक वैभव प्रतिबिंबित झालेले आहे. त्यामुळेच हस्तकला व कलाकुसरीच्या वस्तूंना विदेशात प्रचंड मागणी होती. तत्कालीन काळात या प्रदेशाने कलेली ही क्रांतीच होती.

**संदर्भसूची**

1. पाटील श्रीराम (संपा.) : मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ.२००२ पृ.२०
2. गाठाळ एस.एस. : भारताचा इतिहास व संस्कृती, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. प्र.आ.२००७ , पृ.३९४.
3. मालकर अंजली : मराठवाड्यातील अभिजात संगीत, सुमेरु प्रकाशन, मुंबई. प्र.आ.२००५, पृ.१९.
4. मोरवंचीकर रा.श्री. : प्रतिष्ठान, म.सा.प.औरंगाबाद.जुलै-ऑगस्ट- १९८१, अंक-६, पृ.११
5. काटे .पी.व्ही. : मराठवाड्याचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन,औरंगाबाद, प्र.आ.१९९९. पृ.४१
6. तत्रैव, पृ.६०